# बृहन्मुंबई महानगरपालिका

माहिम प्रसुतिगृह

<u>स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात</u>

क्र.एचओ /४४४ /एमएचएम

**विषय :जी/उत्तर विभागातील सार्वजनिक आरोग्य खात्याअंतर्गत माहिम म्युनि. प्रसूतिगृह येथील ''ड'' संवर्गातील रिक्त पदे कंत्राटी तत्वावर स्वयंसेवी संस्थेमार्फत भरण्याबाबत.**

**बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सार्वजनिक आरोग्य खात्यांतर्गत माहिम म्युनि.प्रसुतीगृह येथील "ड "संवर्गातील 05 रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने(सहा महिन्यांकरिता)प्रशासकीय अधिकारी(घ.क.व्य खाते)जी/उत्तर विभाग यांच्या अधिपत्याखालील नोंदणीकृत स्थानिक स्वयंसेवी सेवाभावी संस्थाकडून (बचतगट वगळून) भरण्याकरिता इच्छूक संस्था, भविष्य निर्वाह निधी राज्य व कर्मचारी विमा योजनेमध्ये नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औद्योगिक सेवा सहकारी संस्था, अशासकिय संस्था (या सर्व संस्थेचा स्थापनेचा उद्देश त्यांच्या सभासदांना रोजगार मिळविणे हा असावा) इत्यादी . संस्थांकडून त्यांची पात्रता यादी तयार करून, सोडत पद्धतीने निवड करण्यासाठी अर्ज मागवीत आहोत. सदर कंत्राटाचा वाटप सोडत पद्धतीने एक (01) पात्र संस्थेला करण्यात येईल.**

**अर्जाचा नमूना माहिम म्युनि.प्रसुतीगृह या कार्यालयामध्ये दि.25.02.2026 ते दि.09.03.2026 पर्यंत वेळ स. 10:30 ते सा. 3:00 पर्यंत मिळेल. इच्छूक संस्थांनी अधिक माहितीकरिता माहिम प्रसुतीगृह कार्यालयामध्ये संपर्क साधावा. संस्थेने अर्ज करण्याची शेवटची तारीख दि.09.03.2026 वेळ दु 01:00 वाजेपर्यंत आहे.**

**नमूद केलेल्या कालावधीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी.**

**सोडत दिनांक – दि. 10.03.2026 रोजी दुपारी 12.00 वा.माहिम प्रसुतीगृह येथे पार पडेल.**

**कार्यालयाचा पत्ता:**

**माहिम प्रसुतिगृह,**

**माहिम पोस्ट ऑफिसच्या बाजूला,दिलीप गुप्ते मार्ग,**

**माहिम, मुंबई - 400016**

**सही/-**

**वैद्यकिय अधिकारी (प्र)**

**माहिम म्युनि.प्रसुतिगृह**

बृहन्मुंबई महानगरपालिका

माहिम प्रसूतिगृह

## अटी व शर्ती

- कंत्राटी कामगारांचा कालावधी सहा महिन्यांकरीता असेल. तदनंतर कंत्राटी कालावधी आपोआप संपुष्टात येईल.
- उपरोक्त कालावधीत नियमित तत्वावर पदे भरल्यास कंत्राटी कामगारांची सेवा संपुष्टात येईल.
- कंत्राटी कामगारांना प्रति दिन रु.792.30/- अधिक लेव्ही एवढे वेतन निश्चित केले आहे या व्यतिरिकत कोणताही भत्ता दिला जाणार नाही.
- यशस्वी संस्थेकडून अनामत रक्कम महानगरपालिकेच्या तिजोरीत भरणे आवश्यक आहे.
- इच्छुक संस्थांकडून लेखी अर्जाची किंमत रु. 3630/- अधिक 18% वस्तु व सेवा कर रोख स्वरुपात

  चलनाव्दारे महानगरपालिकेच्या तिजोरीत भरणे आवश्यक आहे.
- कंत्राटी कामगारांना वेळोवेळी वरिष्ठांनी सांगितल्याप्रमाणे प्रसुतीगृहात तिन्ही पाळयांमध्ये किंवा एकच पाळीमध्ये काम करावे लागेल.(प्रत्येक महिन्यात 4 साप्ताहिक रजा)
- कंत्राटी कामगारांना सदर कालावधीत कोणतीही रजा अनुज्ञेय होणार नाही. तसेच कंत्राटी कामगार ज्या दिवशी गैरहजर असेल त्यादिवशीचे वेतन सदर कर्मचा-यास अनुज्ञेय होणार नाही.
- कंत्राटी कामगारांचे कामावरती कर्तव्य बजावण्यासाठी त्यांना वापरावयाची अंगवस्त्रे हे कंत्राटी संस्थेनेच पुरविणे आहे. तसेच कंत्राटी कामगारास कंत्राटदाराने त्याच्या नावाने ओळखपत्र देणे बंधनकारक राहील.
- कंत्राटी कालावधीत कंत्राटी कामगाराचे काम समाधानकारक न आढळल्यास त्यांची सेवा तात्काळ पूर्वसुचना न देता संपुष्टात करण्यात येईल.
- त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्याने त्यांना मनपा सेवेत सामावून घेण्याबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही अथवा दावा दाखल करता येणार नाही.
- कंत्राटी कामगारांच्या वेतनाची प्रकिया संस्थेकडून त्या त्या महिन्याचे देयक प्राप्त झाल्यानंतर त्याची प्रकिया सुरु केली जाईल.
- एखादा कंत्राटी कामगार कामावर न आल्यास त्वरीत त्याच्याजागी दुसरा कंत्राटी कामगार उपलब्ध करुन देणे हे कंत्राटदारास बंधनकारक राहील.तसेच 5 कामगार न पुरविल्यास जेवढे कामगार
- उपलब्ध नसतील त्या वरून दंड लावण्यात येईल.
- कंत्राटदार व कंत्राटी कामगारांना (Regulation and Abolition) Act 1970 व The Industrial Employment (standing order) Act 1976 च्या तरतूदी लागू असतील. सदर कायद्यातील तरतूदीच्या अनुषंगाने सलग सेवा 240 दिवस पूर्ण होणार नाही याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

- बृहन्मुबई महानगरपालिका सेवानियमावली अटी व शर्तीखाली ही नेमणूक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृतीवेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास कंत्राटी कामगार पात्र रहाणार नाहीत अथवा कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून मिळणारे कोणत्याही प्रकारचे फायदे मिळणार नाहीत.
- संस्थेचा कामगार विहित वेळेवर कामावर हजर झाल्यास त्याला काम देण्यात येईल अन्यथा सहकारी संस्थेने त्याच्या जागेवर बदली कामगार उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. अन्यथा संस्थेस प्रतिदिनी प्रति कामगार रु.500/- इतका दंड आकारण्यात येईल.
- कंत्राटी कामगारांचे वेतन हे पूर्णत स्वयंसेवी संस्थेमार्फत होणार असल्यामुळे त्यांच्या वेतनाची जबाबदारी ही त्या संस्थेची राहील. प्रत्येक महिन्याच्या 10 तारखेपर्यंत कामगारास वेतन अदा केले नाही तर रु. 1000/- इतका दंड आकारण्यात येईल्. सदर संस्थेने मासिक अधिदान कर्षित धनादेश/ECS/RTGS/NEFT व्दारे करणे बंधनकारक राहील.
- परिपत्रक क्र. 26206 दि.31.08.2023 अन्वये विधी व लेखन साहित्य आकार + 18% जीएसटी एवढी रक्कम भरणे आवश्यक आहे.

**सही/-**

**वैद्यकिय अधिकारी (प्र)**

**माहिम म्युनि.प्रसुतिगृह**